# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 20.11.2025 वार- गुरुवार

---

**नवलेपूल**

पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज नवी दिल्लीमध्ये केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन, पुणे बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरच्या नवले पूल परिसरातील अपघात रोखण्यासाठी तातडीच्या उपाययोजनांबाबत चर्चा केली. यावर गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक पावलं उचलण्याची हमी दिली.

**निवडणुक**

पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आणि मतदान केंद्रनिहाय मतदारयादी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी आज जाहीर केली. या निवडणुकीसाठी 41 प्रभागांमध्ये मतदारांची एकंदर संख्या 35 लाख 51 हजार 469 आहे. 9 क्रमांकाच्या सुस-बाणेर-पाषाण प्रभागामध्ये सर्वाधिक 1 लाख पेक्षा जास्त मतदारसंख्या आहे, तर सर्वात कमी मतदार प्रभाग क्रमांक 39 अप्पर सुपर-इंदिरानगरमध्ये 62 हजार 205 आहेत. या प्रारूप मतदार यादीवर येत्या 27 नोव्हेंबर पर्यंत हरकती आणि सूचना दाखल करता येतील. या हरकतींवर निर्णय घेऊन येत्या 5 डिसेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

**NCC**

राष्ट्रीय छात्र सेना अर्थात NCCची राज्यातील छात्रांची संख्या 20 हजाराने वाढवून एक लाख 20 हजार करण्यात येणार आहे. NCC चे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. NCCच्या प्रजासत्ताक दिनाच्या शिबिराची निवड चाचणी पुण्यात सुरु आहे. त्याची पाहणी केल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. NCCच्या वायुसेना आणि नौसेनेच्या तुकड्यांची संख्या वाढवण्यात येणार आहे. विकसित भारत या संकल्पनेचा भाग म्हणून NCCमध्ये बदल करण्यात येत असून अभ्यासक्रमातही बदल करण्यात आला आहे. त्यामध्ये ड्रोन प्रशिक्षण, सायबर सुरक्षा, आपत्ती प्रतिसाद आणि व्यवस्थापन रासायनिक, जैविक आणि आण्विक आपत्ती प्रतिसाद प्रशिक्षण देण्यात येत असल्याचं त्यागी यांनी सांगितलं. राज्यातल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्त जिल्ह्यातील NCC छत्रांना हे प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली असल्याचं ते म्हणाले.

**एचएसआरपी क्रमांक पाटी**

जुन्या वाहनांना 'उच्च सुरक्षा क्रमांक पाटी' म्हणजे एचएसआरपी बसवणं राज्य सरकारनं बंधनकारक केलेलं असतानाही आतापर्यंत राज्यातल्या 47 लाख 23 हजार वाहनांनाच एचएसआरपी बसवण्यात आली आहे. उर्वरित वाहनांना ही पाटी बसवण्यासाठी 30 नोव्हेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर उच्च सुरक्षा क्रमांक पाटी नसलेल्या वाहनांवर कारवाई केली जाईल, असं परिवहन विभागाचे आयुक्त विवेक भीमनवार यांनी सांगितलं.

**सायन्सपार्क**

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पुण्यात दोन सायन्स पार्क उभारले जाणार आहेत. यासाठी जिल्ह्यातील पाच गावांपैकी दोन गावांची निवड करून प्रत्यक्ष काम सुरू केलं जाईल. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी 20 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या संदर्भात बंगळूरमधील अगस्त्य फाउंडेशनबरोबर सामंजस्य करार झाला असून, पहिली पाच वर्ष शिक्षकांना प्रशिक्षण

त्याचबरोबर तांत्रिक सहकार्यही त्यांच्याकडून मिळणार आहे. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी आज ही माहिती दिली. सायन्स पार्कची उभारणी आणि अभ्यास करण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी अगस्त्य फाउंडेशनच्या प्रकल्पाला नुकतीच भेट दिली.

**सफाई सेवकांशी संवाद**

जागतिक शौचालय दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागानं पिंपळे गुरव इथल्या लिनिअर गार्डनमध्ये 'स्वच्छता सेवकांशी संवाद' या विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. यावेळी या सेवकांचा विशेष सत्कार उपायुक्त डॉ.प्रदीप ठेंगल यांच्या हस्ते करण्यात आला.

**कारवाई**

राज्य उत्पादन शुल्क विभागानं अवैध मद्यनिर्मिती, वाहतूक आणि विक्री प्रकरणी धायरी आणि दौंड इथं कारवाई करून 40 लाखापेक्षा जास्त किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी 8 आरोपींना अटक करण्यात आली आहे.

**पुणेग्रँडटूर**

पुण्यात येत्या 19 ते 23 जानेवारी या कालावधीत होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'पुणे ग्रँड टूर'साठी 35 देशांच्या प्रतिनिधींच्या सहभागाला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं तत्वत: परवानगी देण्यात आली आहे. प्रशासनानं पुढाकार घेत सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या माध्यमातून या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचं आयोजन केलं आहे. स्पर्धेला आंतरराष्ट्रीय सायकल संघटनेची मान्यताही मिळाली अ आहे.

**अल्पसंख्याक**

सामान्य मतदारांच्या मूलभूत प्रश्नांकडं प्रस्थापित राजकीय पक्ष दुर्लक्ष करत असल्याचा आरोप भारतीय अल्पसंख्याक सुरक्षा महासंघानं केला आहे. सर्वसामान्य, गोरगरीब, झोपडपट्टीवासी तसंच अल्पसंख्याक समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी भारतीय अल्पसंख्याक सुरक्षा महासंघ पुणे महानगरपालिका निवडणूक लढवणार असल्याची माहिती शहराध्यक्ष तौसिफ अब्बास शेख यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 11 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही किमान तापमान साधारण असंच असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**